**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः06.10.2025** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या,**

- महाराष्ट्रातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकार भरीव मदत करेल, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची ग्वाही
- जागतिक भागीदारांशी रचनात्मक संवाद साधत, धोरणात्मक स्वायत्तता सुनिश्चित करण्यावर भारताचा भर असल्याचं एस. जयशंकर यांचं प्रतिपादन
- बिहार विधानसभेच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर करताना सर्व पैलूंचा विचार केला जाईल मुख्य निवडणूक आयुक्तांची स्पष्टोक्ती
- खोकल्याच्या औषधासंदर्भाने, औषध उत्पादकांनी सुधारित मार्गदर्शक नियमांचं काटेकोर पालन करण्याचे केंद्राचे निर्देश
- नेपाळमध्ये भूस्खलनामुळे आतापर्यंत ५२ जणांचा मृत्यू, पंतप्रधानांकडून शोक व्यक्त.

आणि

- विदर्भाच्या संघाची इराणी करंडकावर तिसऱ्यांदा मोहोर, तर महिला क्रिकेटमध्ये भारताची पाकिस्तानवर मात

**आता सविस्तर बातम्या**

**अमित शहा-अहिल्यानगर**

राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार भरीव मदत जाहीर करेल, अशी ग्वाही केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी काल दिली. अहिल्यानगर जिल्ह्यात लोणी इथं पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील  सहकारी साखर कारखान्याच्या नूतनीकरणाच्या सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी अमित शहा म्हणाले ---

**बाईट – अमित शहा**

केंद्र सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ३ हजार १३२ कोटी रुपयांची मदत मंजूर केली आहे. यापैकी एप्रिलमध्ये १ हजार ६३१ कोटींचा निधी वितरित करण्यात आला असून, यात महाराष्ट्रासाठी २१५ कोटींचं विशेष मदत पॅकेज देण्यात आलं असल्याचं अमित शहा यांनी सांगितल. कर्जवसुलीवर तात्पुरती स्थगिती आणि विद्यार्थ्यांसाठी परीक्षांमध्ये सवलती यांसारखे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत, असं ते म्हणाले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरणही शहा यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**शहा कोपरगाव**

कोपरगावच्या सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखान्यात उभारलेल्या सहकारी तत्त्वावरील देशातील पहिल्या सी.एन.जी. प्रकल्पाचं आणि स्प्रे ड्रायर पोटॅश ग्रेन्युएल प्रकल्पाचं उद्घाटनही काल अमित शहा यांच्या हस्ते झालं. शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याप्रमाणे देशातल्या १५ सहकारी साखर कारखान्यांमध्ये अशा प्रकारचं युनिट उभारण्यात येईल असं शहा म्हणाले.

**कौटिल्य**

प्रगत शस्त्रास्त्रे आणि तंत्रज्ञानाधारित संपर्करहित युद्धांच्या नव्या युगाकडे लक्ष वेधताना अलीकडच्या काळात युद्धाच्या स्वरुपात मूलभूत बदल झाल्याचं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल व्यक्त केलं. दिल्ली आयोजित कौटिल्य आर्थिक परिषदेत ते बोलत होते. अलीकडच्या गुंतागुंतीच्या वातावरणात भारताच्या स्थानाबद्दल बोलताना, देशाची ताकद ही अंतर्गत क्षमता बांधणीमध्ये असल्याचं ते म्हणाले. परस्पर संबंधांना विशेष स्थान न देताही जागतिक भागीदारांशी रचानात्मक संवाद साधत, धोरणात्मक स्वायत्तता सुनिश्चित करणे आणि उत्पादक संबंध राखणे या दृष्टीकोनावर भारताचा भर असेल असे ते म्हणाले. भारत- अमेरिका संबंधाविषयी बोलताना सद्यपरिस्थितीतील व्यापार समस्या सोडवण्यासाठी अमेरिकेशी सक्रीय चर्चा करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**बिहार निआ**

बिहार विधानसभेच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर करताना सर्वंकष विचार केला जाईल अशी स्पष्टोक्ती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काल वार्ताहर परिषदेत केली. निवडणूक आयोग बिहारच्या दोन दिवसीय आढावा दौऱ्यावर आले होते, त्यावेळी पाटणा इथं वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या संदर्भात आयोगाने राजकीय पक्षांशी चर्चा केली असून मतदान वेळापत्रक अंतिम करताना सर्व पैलू विचारात घेतले जातील, असंही त्यांनी सांगितलं.

मतदार यादीचे पुनर्रीक्षण कायदेशीररित्या वैध असल्याचं तसेच विशेष पुनर्रीक्षण मोहीम लोकप्रतिनिधित्व कायद्याअंतर्गत राबवण्यात आल्याचंही ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं. मुक्त, निष्पक्ष आणि शांततापूर्ण निवडणुकी सुनिश्चित करण्यासाठी विधानसभा निवडणुकीपुर्वी १७ नवे उपक्रम राबवण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

**खोकला**
बालकांना झालेला खोकला स्वतःहून बरा होतो आणि बऱ्याच प्रकारांमध्ये औषधोपचारांची आवश्यकता नसते. सर्व औषध उत्पादकांनी सुधारित मार्गदर्शक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. असा सल्ला केंद्र सरकारने राज्यांना दिला आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने औषधांच्या गुणवत्तेच्या निकषांचे पालन करण्यासंदर्भातील पुनरावलोकन करण्याच्या उद्देशाने बालरोगतज्ञांची एक उच्चस्तरीय बैठक काल घेतली त्यांनंतर या सूचना देण्यात आल्या आहेत. सहा राज्यांमधील १९ उत्पादन युनिट्समध्ये जोखीम-आधारित तपासणी सुरू करण्यात आली आहे. खोकल्याच्या औषधामुळे मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये मुलांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाने तामिळनाडूतील कांचीपुरम जिल्ह्यातील स्रेसन फार्मा द्वारे मे २०२५ मध्ये उत्पादित केलेल्या बॅच क्रमांक SR-१३ या सिरपमध्ये डायथिलीन ग्लायकोल या विषारी पदार्थाची भेसळ असल्याचा आरोप केला आहे. या उत्पादनाची मुदत एप्रिल २०२७ पर्यंत आहे. एफडीएने सर्व या उत्पादनाची विक्री, वितरण किंवा वापर तत्काळ थांबवण्याचे निर्देश दिले आहेत.

**राजनाथ ऑस्ट्रेलिया**
संरक्षणमंत्री राजनाथ सिंह येत्या ९ ऑक्टोबरपासून दोन दिवसांच्या अधिकृत ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर रवाना होणार आहेत. ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान आणि संरक्षण मंत्री रिचर्ड मार्लस यांच्या निमंत्रणावरून हा दौरा होणार आहेत. यावेळी संरक्षण मंत्री दोन्ही देशांतील उद्योग नेत्यांच्या एका गोलमेज परिषदेचे अध्यक्षपद भूषवणार आहेत. या भेटीमध्ये तीन करार होण्याची अपेक्षा असून, ज्यामुळे माहितीची देवाणघेवाण, सागरी क्षेत्र आणि संयुक्त उपक्रमाच्या क्षेत्रात सहकार्य वृद्धींगत होण्याची अपेक्षा असल्याचं संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे.

**गोयल कतार**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आजपासून दोन दिवसांच्या कतार दौऱ्यावर रवाना होत आहेत. कतारची राजधानी दोहा इथं गोयल कतारच्या वाणिज्य मंत्र्यांसह कतार भारत संयुक्त आयोग बैठक आयोगाचे अध्यक्षस्थान भूषवणार असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. या भेटीतून भारत - कतार यांच्या दरम्यानच्या व्यापार आणि गुंतवणूक संबंधांचे महत्त्व अधोरेखित होणार असल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे. कतारमध्ये व्यावसायिक, सनदी लेखापाल संघटना,उद्योग परिषद, उद्योग सदस्य आणि भारतीय समुदायाशी गोयल संवाद साधतील.

**इंडोनेशिया शाळा**

इंडोनेशियामध्ये शाळा कोसळून झालेल्या दुर्घटनेत मृतांची संख्या ४५वर पोचली आहे. बचाव पथकानं ढिगाऱ्याखालून आणखी मृतदेह बाहेर काढल्याने ही संख्या वाढली.

**जयपूर रुग्णालय**

जयपूरच्या सवाई मान सिंह रुग्णालयाच्या ट्रॉमा केंद्राच्या अतिदक्षता विभागात काल रात्री भीषण आग लागन सहा जणांचा मृत्यू झाला. केंद्राचे प्रभारी डॉक्टर अनुराग धाकड यांनी शॉर्ट सर्किटमुळे आग लागून ती वेगाने पसरल्याने विषारी वायू बाहेर पडला. आगीतून २४ रुग्णांना वाचवण्यात यश आलं मात्र तातडीने बचाव आणि प्राणरक्षक प्रणाली देऊनही सहा गंभीर रुग्णांना वाचवण्यात यश आलं नसल्याचं सांगितलं.

**पाऊस**

पश्चिम बंगाल राज्यात दार्जिलिंगमध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये आतापर्यंत २३ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी

दुःख व्यक्त केलं आहे. नेपाळमध्येही मुसळधार पावसामुळे, भूस्खलन झालं असून अचानक आलेल्या पुरामुळे रस्ते बंद झाले आहेत. पूल वाहून गेले असून शुक्रवारपासून आतापर्यंत किमान 49 जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती, नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. नेपाळमध्ये झालेल्या जीवितहानी बद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. या कठीण काळात भारत, नेपाळच्या जनतेसोबत आणि सरकारसोबत उभा असल्याचं, त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**इराणीकरंडक**

प्रथम वर्ग क्रिकेटमध्ये नागपूर इथं झालेल्या स्पर्धेत, विदर्भानं काल शेष भारत संघाचा ९३ धावांनी पराभव करत तिसऱ्यांदा इराणी चषकावर नाव कोरलं. विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झालेल्या या पाच दिवसांच्या सामन्यात विदर्भानं पहिल्या डावात, ३४२ धावा केल्या, तर शेष भारताचा डाव २१४ धावांवर आटोपला. दुसऱ्या डावात विदर्भानं २३२ धावा केल्या. त्यामुळे त्यांची आघाडी ३६० धावांची झाली. त्यानंतर, शेष भारताचा दुसरा डाव २६७ धावात गुंडाळला. हर्ष दुबेनं चार बळी घेतले.

**क्रिकेट**

महिलांच्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल भारतीय संघाने सांघिक खेळाचे प्रदर्शन करत पाकिस्तानचा 88 धावांनी पराभव केला.भारताच्या 247 धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ 159 धावांवर बाद झाला.भारताकडून सामनावीर क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी 3 गडी बाद केले. भारतीय महिला संघाचा पाकिस्तानबरोबर मर्यादित षटकांच्या सामन्यात 12 वेळा सामना झाला असून बाराही वेळा भारताने पाकला धूळ चार आहे.स्पर्धेतील या दुसऱ्या विजयाने भारतीय संघ गुणतालिकेत अव्वलस्थानी आहे.

भारताचा पुढील सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध येत्या 9 तारखेला विझाग इथं होणार आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या,**

- **महाराष्ट्रातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकार भरीव मदत करेल, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची ग्वाही**
- **जागतिक भागीदारांशी रचनात्मक संवाद साधत, धोरणात्मक स्वायत्तता सुनिश्चित करण्यावर भारताचा भर असल्याचं एस. जयशंकर यांचं प्रतिपादन**
- **बिहार विधानसभेच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर करताना सर्व पैलूंचा विचार केला जाईल मुख्य निवडणूक आयुक्तांची स्पष्टोक्ती**
- **खोकल्याच्या औषधासंदर्भाने, औषध उत्पादकांनी सुधारित मार्गदर्शक नियमांचं काटेकोर पालन करण्याचे केंद्राचे निर्देश**
- **नेपाळमध्ये भूस्खलनामुळे आतापर्यंत ५२ जणांचा मृत्यू, पंतप्रधानांकडून शोक व्यक्त.**

**आणि**

- **विदर्भाच्या संघाची इराणी करंडकावर तिसऱ्यांदा मोहोर, तर महिला क्रिकेटमध्ये भारताची पाकिस्तानवर मात**

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.